Email : asgrf२०१४@gmail.com
Web : www.krutishilnivrutta.org
श्री. टी. के. गुरव, सरचिटणीस मो.नं.९९७०५७४००४
ॲड. दशरथ बनसोडे, चिटणीस मो.नं.९८२२८८२२५८

# महाराष्ट्र राज्य निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे-9

## सन 2021-22 या कालावधीसाठी संघटनेच्या वतीने सरचिटणीसांचा प्रशासकीय अहवाल

1) **महाराष्ट्र शासनाकडून सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या कृतिशील व्यक्तींना एकत्र आणून त्यांच्या दीर्घ सेवेतील अनुभवाचा लाभ सामान्य नागरिकांना मिळावा व त्यांच्या स्वत:च्या प्रकृती स्वास्थ्यासाठी ते कार्यरत रहावेत** या उद्देशाने कृतिशिल निवृत्त अधिकारी कर्मचारी मध्यवर्ती संस्था पुणे येथे दि.31/05/2014 रोजी कार्यरत झाली आहे. हि संस्था, सहाय्यक संस्था निबंधक, पुणे यांचेकडील नोंदणी क्र. 1151 दि.31/05/2014 अन्वये तसेच धर्मादाय आयुक्त, पुणे यांचेकडील नोंदणी क्र. फ-48300 दि.23/03/2017 अन्वये शासन मान्य आहे.

2) माहे मे 2014 मध्ये मंत्रालय, मुंबई येथे अखील भारतीय राज्य कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री. र. ग. कर्णीक, महाराष्ट्र राज्याचे निवृत्त मुख्य सचिव श्री.अरुण बोंगिरवार, निवृत्त पोलिस महासंचालक श्री.अरविंद इनामदार, श्री.नंदकुमार जंत्रे, निवृत्त सचिव, सा.प्र.विभाग, मंत्रालय, श्री.भालचंद्र जोशी, निवृत्त अवर सचिव, पाटबंधारे विभाग, श्री. योगीराज खोंडे, अध्यक्ष, राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटना, मंत्रालय, श्री. टी. के. गुरव, अध्यक्ष, कर्मचारी कल्याणकारी संस्था, पुणे यांनी एकत्र येऊन "**कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संस्था"** स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी आमंत्रित केलेल्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे पदाधिकाऱ्यांची निवड करणेत आली.

| **अ. क्र** | सर्वश्री / श्रीमती | **पद** |
|---|---|---|
| 1 | अरुण बोंगिरवार, भा.प्र.से. | अध्यक्ष |
| 2 | अरविंद सिद्धेश्वर इनामदार, भा.पो.से. | विशेष अध्यक्ष |
| 3 | नंदकुमार येडबा जंत्रे, भा.प्र.से. | उपाध्यक्ष |
| 4 | शितल अशोक गुप्ते | उपाध्यक्षा |
| 5 | रमाकांत गणेश कर्णीक | कार्याध्यक्ष |
| 6 | भालचंद्र त्र्यंबक जोशी | सहकार्याध्यक्ष |
| 7 | शिवदास रंगनाथ साळुंके | सचिव |
| 8 | तुकाराम केशव गुरव | सहसचिव |

| | | |
|---|---|---|
| 9 | दादाराव चिनकुजी सांगळे | कोषाध्यक्ष |
| 10 | नारायण सखाराम गरुड | सहकोषाध्यक्ष |
| 11 | सुलोचना हरसिंग पाटील | सदस्य |
| 12 | योगिराज खोंडे, अध्यक्ष, राज्य कर्मचारी संघटना, मुंबई | पदसिद्ध सदस्य |
| 13 | टी.के.गुरव, अध्यक्ष, शासकीय कर्मचारी कल्याणकारी संस्था, पुणे | पदसिद्ध सदस्य |

3) दि.27/03/2022 रोजीच्या पहिल्या सर्वसाधारण बैठकीत पुढील 5 वर्षासाठी नवीन कार्यकारीणी गठीत करणेत आली. ती खालीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र** | सर्वश्री / श्रीमती | **पद** |
|---|---|---|
| 1) | श्री.चंद्रकांत दळवी (भाप्रसे) | अध्यक्ष |
| 2) | इजि. व्यंकटराव गायकवाड | विशेष अध्यक्ष |
| 3) | श्री. बाजीराव जाधव (भाप्रसे) | उपाध्यक्ष |
| 4) | श्री.दिलीप एम. देशमुख, | उपाध्यक्ष |
| 5) | श्री. रविंद्र धोंगडे | उपाध्यक्ष |
| 6) | श्री.शिवाजी मानकर | उपाध्यक्ष |
| 7) | इंजि.मनोहर पोकळे | कार्याध्यक्ष |
| 8) | श्री.बाळासाहेब साळुंके | सहकार्याध्यक्ष |
| 9) | श्री.तुकाराम गुरव | सरचिटणीस |
| 10) | श्री.सुनिल कुऱ्हाडे | कोषाध्यक्ष |
| 11) | श्री. गिरीश सांगळे | सहकोषाध्यक्ष |
| 12) | डॉ.मधुकर गिरी | विधी सल्लागार/ कार्यकारीणी सदस्य |
| 13) | श्री.नारायण सखाराम गरुड | सदस्य |
| 14) | श्रीमती सुनंदा जरांडे | सदस्य |
| 15) | श्री.अशोक सोनू जाधव | सदस्य |
| 16) | श्रीमती नयना थोरात | सदस्य |
| 17) | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र, मुंबई | पदसिद्ध सदस्य |

| | | |
|---|---|---|
| 18) | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, मुंबई | पदसिद्‌ध सदस्य |

4) स्थापनेनंतर आजअखेर राज्यात अहमदनगर, मालेगाव, परभणी, पुणे, सातारा, सांगली, नाशिक, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, भंडारा, अमरावती व सोलापूर या **13 जिल्हयांत** जिल्हा **शाखा कार्यरत** आहेत. तसेच राज्यात इतर **22** जिल्हयात अकोला, जळगाव, धुळे, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, कोल्हापूर, चंद्रपूर, नागपूर, बुलढाणा, वर्धा, रायगड, ठाणे, सिंधूदुर्ग, रत्नागिरी, पालघर, मुंबई शहर व उपनगर, वाशिम, यवतमाळ इ. ठिकाणी प्रवर्तक नेमण्यात आले असून संघटना बांधणीचे काम जोराने सुरु आहे. तर उर्वरीत 3 जिल्हयांत नंदूरबार, गोंदिया व गडचिरोली प्रवर्तक नेमण्याची चाचपणी सुरु आहे. माहे डिसेंबर **2023** अखेर महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयांत **कृतिशील शाखा** कार्यरत करण्याचा निर्धार या नूतन वर्षाचे आरंभास करणेत आला आहे. राज्यातील सध्या कार्यरत 13 जिल्हयातील समन्वय समितीचे पदाधिकारी यांचा नाववार तक्ता तसेच उर्वरीत 21 जिल्हयातील कार्यरत प्रवर्तकांचा तपशिल या सोबतच्या पुस्तिकेत करण्यात आला आहे.

5) **सेवानिवृत्तांचे पेंशनविषयक प्रश्न सोडविणे, त्यांच्या सुरक्षिततेची व स्वास्थ्याची काळजी घेणे ही कामे प्राधान्याने करण्यात येत आहेत. तसेच त्यांचे वैयक्तिक अडीअडचणींवर, त्यांनी विनंती केल्यास, त्यांना मोफत सल्ला/मार्गदर्शन करण्यात येत आहे.**

केंद्र सरकारने जेष्ठ नागरिकांसाठी सुधारीत 2016 मागदर्शक सूचना तर महाराष्ट्र शासनाने सुध्दा दि.9 जुलै 2018 च्या शासन निर्णयान्वये जेष्ठ नागरिकांचे धोरण प्रसिध्द केले आहे. शासनाने प्रसिध्द केलेल्या धोरणाबाबत येणाऱ्या अडीअडचणी तसेच विनासायास त्याची अंमलबजावणी होणेच्या दृष्टीकोनातून आपल्या निवृत्त बंधू भगिनींना तसेच असंघटीत ज्येष्ठ नागरिकांना सरकारच्या धोरणांची माहिती उपलब्ध करुन देणेसाठी राज्यस्तरावर या संस्थेकडून/संघटनेकडून कार्यवाही होणेही अत्यावश्यक आहे.

सेवानिवृत्त व जेष्ठांसाठी आरोग्य तपासणी तसेच व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, संमेलने आयोजित करणे, सभासदांचे हितसंबंध वृध्दींगत व्हावे, या व अशा एकना अनेक बाबींच्या दृष्टीने सामाजिक बांधीलकी म्हणून सर्वतोपरी प्रयत्न **करीत** आहे.

संघटन अधिक कार्यक्षम व तत्पर होणेसाठी तालुका, जिल्हा व प्रदेश पातळीवर तसेच राज्यभर बळकटीकरण व विस्तार करणेकामी तसेच आपणा सर्वांची वयोमानात झालेली वृध्दी विचारात घेता आपण सर्व निवृत्त अधिकारी कर्मचारी यांनी राज्यभर एकत्र येऊन कार्यक्षम संस्था म्हणून लौकीक मिळवू या असे आवाहन करण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक सभासदाने रु.**1000/-** आजीव सभासद फी व रु.**100/-** वार्षिक सभासद फी तसेच प्रवेश फी रु.**10/-** फॉर्म भरुन आपला सहभाग नोंदवावा, ही आग्रहाची विनंती.

6) सभासद नोंदणी अभियान प्रथमत: माहे ऑगस्ट 2022 ते ऑक्टोबर 2022 अखेर राबविण्याचे दि.27/08/2022 चे प्रसिद्धी पत्रकान्वये ठरविले होते. परंतु राज्यात झालेला पाऊस तसेच कोविडचा नवीन विषाणू प्रादुर्भाव झाल्याने सभासदांचे मागणीनुसार अभियान माहे डिसेंबर 2022 अखेर वाढविण्यात आले. याचा परिणाम म्हणून राज्यात ------------- आजीव -------------- वार्षिक सभासदांची नोंदणी करण्यात आली.

7) महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी संघटना या **संस्थेसाठी उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करणेबाबत परिपत्रक क्र.7 दि.2/11/2022 निर्गमित करुन कामकाज गतिमान करणेचा प्रयत्न** केला आहे. **आयकर अधिनियम 80-जी नुसार प्रस्ताव आयकर विभागाकडे** मानद सल्लागार यांचे मार्फत सादर करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

8) महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी संघटनेमार्फत **हाती घ्यावयाची उपक्रमांची यादी** परिपत्रक क्र.10 जा.क्र.179 दि.25/12/2022 नुसार सर्व जिल्हा शाखांना प्रसारित केली.

9) सेवानिवृत्त व जेष्ठ नागरिकांसाठी समाजोपयोगी कार्यक्रम राबविणेचा वार्षिक आराखडा तयार करणेकामी निर्देश सूचना क्र.32 दि.2/4/2022, 33 दि.18/4/2022, 35 दि.3/8/2022, 161 दि.3/12/2022 व 180 दि.25/12/2022 नुसार जिल्हा शाखांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. **त्यानुसार जिल्हास्तरीय शाखेने उपक्रम हाती घ्यावेत. यात जिल्हास्तरीय समितीस अजून काही उपकम हाती घ्यावेसे वाटले तरी ते घेता येतील अशी लवचिकता ठेवणेत आली आहे.**

10) **1 जाने.2016 पूर्वीचे तसेच 80 वर्षे व त्यावरील अतिवृद्धनिवृत्ती वेतनधारकांना सेवानिवृत्ती वेतन धारक/कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना नोशनल पद्धतीने पे फिक्सेशन करणे कामी लढानिधी उभारणेबाबत** संघटनेच्या सर्व सदस्यांना जा.क्र.152 दि.2/11/2022, 156 दि.16/11/2022 तसेच लढानिधी उभारणेच्या **सुचना परिपत्रक क्र.8 (सु-सुधारीत) निर्गमित केल्याने** आज माहे फेब्रुवारी 2023 अखेर रु.1,59,600/- लढानिधी न्यायालयीन प्रकरणी पुढील कार्यवाहीसाठी उपलब्ध झाला आहे.

11) उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी **रिट याचिका क्र.3833/2018 शासनाने कोणतीही कार्यवाही न केल्याने अवमान याचिका** क्र. 370/2019 व 372/2019 यात कालवा निरीक्षक, मोजणीदार या पदांच्या वेतननिश्चीती राज्य वेतन समिती 2017 (बक्षी समिती) अहवाल खंड-2 नुसार शासनास सादर केलेल्या दि9/2/2021 रोजी **एकाकी पदासंदर्भात मा.उच्च न्यायालय,**

**खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार 3 महिन्यांचे आत मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेऊन अन्याय दूर करणेबाबत शासनास** जा.क्र.9 दि..11/1/2023 नुसार पाठपुरावा चालू आहे.

12) दि.1 जाने. 2016 पूर्वी निवृत्त झालेल्या पेन्शनरांकरीता 7 व्या वेतन आयोगात बेसीक पे रिव्हीजन व 80 वर्षे व त्यावरील अतिवृद्ध निवृत्ती वेतनधारकांसाठी अतिरिक्त वेतन मिळणेकामी **सभासदांच्या हिताची जोपासना करण्यासाठी आवश्यकता असल्याने मा.उच्च न्यायालयात/ सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करणेकामी विहीत प्रपत्रात माहिती उपलब्ध करणेबाबत परिपत्रक क्र.12 दि.2/2/2022 नुसार माहिती मागवून भविष्यात त्यांनाच फायदा होऊ शकतो**, त्यायोगे जास्तीत जास्त सभासदांची नावे अंतर्भूत व्हावीत यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन सर्व राज्यातील पदाधिकाऱ्यांना करण्यात आले आहे.

13) महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी महासंघ स्थापन करणेकामी जिल्हा पातळीवर महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी संघटना तसेच **राज्यातील नोंदणीकृत राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर सेवा निवृत्तांच्या संस्थांना संलग्नता देण्याबाबत अभ्यास करणेसाठी नेमलेल्या अभ्यासगटाची माहिती पहिली बैठक दि.18/10/2022 रोजी पार पडली.** राज्यातील मान्यताप्राप्त पेन्शनर असोसिएशनची माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालय यांचेकडून मागणी केली आहे. पुढील पाठपुरावा चालू आहे.

14) मध्यवर्ती संघटनेच्या स्तरावर ॲड. दशरथ बनसोडे हे वरिष्ठ लिपीक पदावरुन लघूवाद न्यायालय, पुणे येथून निवृत्त होऊन सेवा कालावधीत न्यायालयीन कामाचा अनुभव तसेच विधी पदवी संपादित केली असल्याने त्या विचारात घेवून **सरचिटणीस पदी ठराव क्र. 9-अ नुसार** नेमणूक करण्यात आली.

15) संस्थेचे पत्रव्यवहारासाठी ई मेल आयडी "asgrf2014@.com" कार्यान्वित करणेत आला येऊन नाशिक, पुणे, सातारा, अमरावती, सोलापूर, परभणी यांचे ई.मेल आयडी तयार करण्यात आले असून वापरही सुरु करण्यात आला आहे, तर उर्वरीत जिल्हयांचे ई.मेल आयडी **स्मरणिका 2022 मध्ये पान क्र. 112 वर तयार केले असून त्यांनी ते कार्यान्वित करुन वापर करणे अपेक्षित आहे.**

16) प्रत्येक सदस्याचे **वैयक्तिक तपशील प्रपत्रही** अंतिम करणेत आले असून अशी माहिती भविष्यातील कामाचे नियोजनासाठी जिल्हा/राज्यस्तरावर वापर करणेत यावा असे अपेक्षित आहे. याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

17) जिल्हा समन्वय समितीस मदतनीस म्हणून **(अ) पेंशनर उपसमिती, (ब) दक्षता उपसमिती व (क)आरोग्य उपसमिती** स्थापन करुन संस्थेचे कामकाज लोकाभिमुख होऊन समाजात चेतन्य निर्माण होवून संस्था आधारवृक्ष म्हणून कार्यरत राहणार आहे. अश्या समित्या पुणे व अहमदनगर जिल्हा समन्वय समितीने स्थापन करुन कामही सुरु केले आहे. तर उर्वरी जिल्हा समन्वय समितीत अशी कार्यवाही प्रगतीत आहे.

18) हि संस्था व त्यांचे अंतर्गत जिल्हा समन्वय समितीचे कामकाज पारदर्शक होणेचे दृष्टीने उपलब्ध निधीतून खर्च भागविणेसाठी **काटकसरीच्या उपाययोजनास मान्यता** देणेत येऊन सर्वांनी अनुपालन करणेची आवश्यकता आहे.

19) **"कृतिशील निवृत्त राज्यस्तरीय विचार मंच"** - सर्वांना सन्मानाचे जीवन जगता यावे, ज्येष्ठ नागरीक धोरण सन 2018 ची अंमलबजावणी, नवनवीन संकल्पनांचा वापर करुन आरोग्य सुखकारक व्हावे, असंघटीत क्षेत्रातील ज्येष्ठांना आपल्या सेवा कालावधीत मिळालेले ज्ञानाचा वापर करुन जीवन जगणे सुकर व्हावे, हा विचार या मंचासाठीचा आहे. निवृत्त कर्मचाऱ्यांचे पेंशनचे व इतर जीवनातील प्रश्नांबाबत सोडवणूक करणेसाठी सर्वतोपरी मदत करणे, सुशिक्षित तरुण, महिला, दिव्यांगासाठी उचित मार्गदर्शन व शासनाच्या विविध योजना राबविणेस मदत करणे, इ. यासाठी "विद्या विनयेन शोभते" व "विद्वान सर्वत्र पुज्यते" या प्रचलित निकषाद्वारे शासनाकडे नवनवीन प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे. हा मंच दि.1 जानेवारी 2022 पासून कार्यान्वित करणेत आला असून तो कार्यक्षमतेने कार्यरत आहे.

20) कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संस्थेची उद्दीष्टे, भूमिका, कार्यकक्षा, सभासद नोंदणी अभियान त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी याविषयी सविस्तर सुसंवाद साधणेसाठी विविध जिल्हयांचे खालीलप्रमाणे दौरे करण्यात आले.

(अ) औरंगाबाद महसूल विभागात कार्याध्यक्ष, सरचिटणीस यांनी दि.19/05/2022 ते 23/05/2022 या कालावधीत औरंगाबाद, जालना, परभणी व हिंगोली

(ब) पुणे महसूल विभागात संघटनेचे कार्याध्यक्ष इंजि. एम.क. पोकळे, सरचिटणीस श्री. टी. के. गुरव व कार्यकारी सदस्य श्री. गिरीष सांगळे यांनी दि.6/6/2022 रोजी सोलापूर,

(क) औरंगाबाद महसूल विभागात कार्याध्यक्ष, सरचिटणीस यांनी दि.7/12/2022 ते 10/12/2022 या कालावधीत बीड, परभणी, नांदेड, लातूर व उस्मानाबाद,

(ड) नाशिक महसूल विभागात कार्याध्यक्ष व सहकोषाध्यक्ष यांनी दि.17/12/2022 ते 22/12/2022 या कालावधीत मालेगाव, धुळे, जळगाव, बुलडाणा व औरंगाबाद

(इ) कोकण व पश्चिम महाराष्टात कार्याध्यक्ष, सरचिटणीस व चिटणीस यांनी दि.17/01/2023 ते 21/01/2023 या कालावधीत ठाणे, पनवेल, देवरुख, कोल्हापूर, सांगली व सातारा तर

**21)** महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी **मध्यवर्ती संघटना**, पुणे यांनी दि.29/12/2022 रोजी शिक्षक भवन, पुणे येथे विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळचे सत्रात सभासद नोंदणी अभियान, संस्थेची उद्दीष्टे व कार्यपद्धती, तसेच सदस्यांशी सुसंवाद साधण्यात

आला. व दुपारच्या सत्रात **लॉरेन्स अ‍ॅण्ड मंसो, पुणे यांचेतर्फे सदस्यांसाठी डोळे तपासणी शिबीर मोफत आयोजित करण्यात येवून 50 सदस्यांनी लाभ घेतला.**

22) कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेसाठी **डिजीटल प्लॅटफॉर्म पुर्ण क्षमतेने कार्यरत करणेचा संकल्प करण्यात आला.** यात संघटनेचे संकेत स्थळ, ईमेलद्वारे पत्रव्यवहार, फेसबुक पेज, व व्हॉटस्अ‍ॅप ग्रुप गतिमान अद्यावत करणे, यात मध्यवर्ती संघटनेचे ग्रुप्स व जिल्हास्तरीय ग्रुपचा समावेश आहे.

**23) नूतन वर्ष सन 2023 चा संकल्प :**

अ) सर्व जिल्हा शाखा या वर्षअखेरीस कार्यरत करणे.

ब) जिल्हास्तरीय पेन्शनर, दक्षता व आरोग्य उपसमित्या कृतिशील जिल्हा शाखांनी तात्काळ कार्यान्वित करणे

क) 1 जाने. 2016 पूर्वी निवृत्त झालेल्या पेन्शनरांकीता नोशनल पे फिक्सेशन पद्धतीने 7 व्या वेतन आयोगात बेसिक पेन्शन रिव्हीजन व 80 वर्षे व त्यावरील अतिवृद्ध निवृत्तीवेतन धारकांसाठी अतिरिक्त वेतन मिळणेकामी लढा निधी उभारणी करणे.

ड) जिल्हा व राज्यस्तरीय कृतिशील संघटनेने सभासद फी कायम ठेवीत अबाधीत ठेवून उत्पन्नाचे स्त्रोत विकसीत करुन स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करणे

इ) महाराष्ट्र राज्य कृतिशील अधिकारी कर्मचारी महासंघ स्थापन करणेकामी विशेष प्रयत्न करणे.

ई) राज्यात नागपूर व अमरावती महसूल विभागाचा जिल्हानिहाय दौरा उन्हाळ्यापूर्वी पूर्ण करणे.

**२४) सातारा जिल्हा शाखा**

- डिजीटल प्लॅटफॉर्मचा वापर करणेचा प्रयत्न सातत्याने केला जातो.
- पहिल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीरातीमधून राज्यात द्वितीय क्रमांकाचे योगदान
- महागाव, ता. सातारा येथे ज्येष्ठ नागरीक दिनी (दि.०१/१०/२०२१) मातोश्री वृद्धाश्रमात जावून विचारपूस व माणूसकीची मदत

- दि.०१/०९/२०२१ रोजी मौजे रेंगडी ता. जवळा येथे अतिवृष्टी व भुस्खलन झालेल्या भागांची पाहणी करुन आपदग्रस्तांना भांडी, साड्या व खाऊचे वाटप
- संघटनेच्या अहवाल काळात ५ वा वर्धापन दिन (दि. २८/०९/२०२२ रोजी) राज्यात याच जिल्ह्याने वैशिष्ट्यपूर्ण साजरा केला. यात संघटनेने गुणवंत सभासद, वैशिष्ट्यपूर्ण काम करणारे ज्येष्ठ नागरीक तसेच नावलौकीक कमावलेल्या व शिक्षणक्षेत्रात उज्वल यश मिळालेल्या सभासदांचे पाल्यांना मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.
- जिल्हास्तरीय संघटनेने विविध सहलींचे आयोजन केले.

**२५) अहमदनगर जिल्हा शाखा**

- पेन्शनर उपसमिती, दक्षता व आरोग्य उपसमिती यांची घटना जिल्हास्तरावर तयार करुन राज्यासाठी मार्गदर्शक
- सर्व सभासदांचे आरोग्य उत्तम रहावे यासाठी डॉ. खाडे, उपाध्यक्ष यांनी प्रश्नावली तयार करुन सभासदांकडून भरुन घेऊन त्याचे पृथःकरण करुन आलेल्या निष्कर्षावर औषधोपचाराचा पाठपुरावा करण्यात येत आहे.
- देहदान, नेत्रदान, अवयवदान जागृती करण्यासाठी जिल्हास्तरावर कार्यशाळा घेऊन सर्वांनाच उद्युक्त करण्यात आले.
- सर्वच सदस्यांना ओळखपत्रे जारी केली
- 'मातोश्री' वृद्धाश्रम व मन गांव या संस्थेस भेट देऊन उपक्रमांची माहिती घेऊन वृद्धाश्रम स्थापन करणेचा मासन
- आमच्या भगिनी श्रीमती लता तोरणे, संघटक, आरोग्य सहाय्यीका, जिल्हा परिषद, अ.नगर यांनी अहवालवर्षात ४५ महिला सभासद करणेचा तनमनधनाने अभिनव उपक्रम राबविला.
- या जिल्हा शाखेचे अध्यक्ष, इंजि. मनोहर पोकळे यांचा दि. २९/०५/२०२२ रोजी शिर्डी येथे महाराष्ट्र पत्रकार संघाचे १८ व्या अधिवेशनात "राज्यस्तरीय समाजसेवक पुरस्कार", मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. हा पुरस्कार या संघटनेच्या सर्व सभासदांप्रती अर्पण करीत असल्याचे श्री. पोकळे यांनी सांगितले.

**२६) नाशिक जिल्हा शाखा :**

कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी नाशिक संस्थे तर्फे 'जु. स. रुंगटा हायस्कूल' येथील हॉल मध्ये कृतिशील संस्थेची बैठक पार पडली. या वेळी वारी एक अनुभव या विषयावर व्याख्यान प्रसंगी डॉ राजेंद्र कलाल बोलत होते. सुभाषचंद्र येवले पाटील अध्यक्षस्थानी होते.

व्यासपिठावर महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाचे अप्पर राज्यकर आयुक्त सुमेरकुमार काले, वित्त व सेवा संचालक बाळासाहेब घोरपडे, श्यामसुंदर जोशी उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष दिलीप पाटील यांनी नवीन कार्यकारिणीची ओळख करून दिली. संस्थेचे सहसचिव रियाज यांनी डॉ.कलाल यांना गीताग्रंथ व शाल देऊन त्यांचा सत्कार केला.

पंढपुरच्या आषाढी एकादशी निमित्त जाणाऱ्या वारीतुन उर्जा मिळते. तर तरुण पिढी सुद्‌धा वारीत सहभागी होत आहेत असे प्रतिपादन सामाजिक व न्याय विभागाचे माजी उपायुक्त व नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ राजेंद्र कलाल यांनी केले.

विठोबारायाची मूर्तीपासून वारीचा ७१९ वर्षा पासूनचा इतिहास, रथ, वारी, दिंडी आदी माहिती तपशीलवार सांगितली. डॉ. कलाल यांनी २३ वेळा वारी केल्याने, वारकरी त्यांचे अनुभव, राहण्याची, खाण्याची व्यवस्था, शासकिय सेवा याबाबत माहिती उपस्थितांना माहिती दिली. तरुण पिढी सध्या वारीचा अनुभव घेत असल्याचे निदर्शनास आणून मदन या तरुणाने वारी केल्याने त्याचाही सत्कार करण्यात आला.

-----------------------------